# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २८/०२/२००५

आज दि. २८/०२/२००५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सुचना क्र. ०८, दि. २१/०२/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट | महापौर |
| २) | श्री. वैती चंद्रकांत सिताराम | उपमहापौर |
| ३) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | उप-सभापती,महिला बालकल्याण |
| ८) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | सदस्य |
| ९) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| १०) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| ११) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १२) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १३) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १४) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १५) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १६) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १७) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १८) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १९) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| २०) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| २१) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २२) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २३) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २४) | श्री. पाटील रोहिदास शंकर | गटनेता |
| २५) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २६) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २७) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २८) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २९) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | सदस्य |
| ३०) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ३१) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| ३२) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३३) | श्रीम. सावळे निर्मला बाबूराव | सदस्या |
| ३४) | श्री. माळी रविंद्र भीमदेव | गटनेता |
| ३५) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३६) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३७) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३८) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३९) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ४०) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ४१) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ४२) | श्री. पटेल आसिफ गुलाम | सदस्य |
| ४३) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ४४) | श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत | सदस्या |
| ४५) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४६) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४७) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ४८) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४९) | श्री. मेंडोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ५०) | श्री. पाटील रोहिदास आत्माराम | सदस्य |
| ५१) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५२) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५३) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ५४) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५५) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५६) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५७) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५८) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५९) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ६०) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ६१) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ६२) | श्री. पाटील ध्रुवकिशोर | सदस्य |
| ६३) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ६४) | श्री. पाटील रतन कृष्णा | सदस्य |
| ६५) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६६) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६७) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | गटनेता |
| ६८) | श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण | सदस्य |
| ६९) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ७०) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्य |
| ७१) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ७२) | श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ७३) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ७४) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ७५) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ७६) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |
| ७७) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७८) | श्री. संजय नारायण पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७९) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ८०) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ४) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

नमस्कार. आदरणीय उपमहापौर, सर्व उपआयुक्त, स्थायी समिती सभापती, महिला व बालकल्याण समिती सभापती, मा. सभागृहनेते, मा. विरोधी पक्ष नेते तसेच सर्व गटनेते व उपस्थित सर्व सन्मा. नगरसेवक/नगरसेविका तसेच सर्व खातेप्रमुख, पत्रकार व नागरिक बंधु-भगिनी. शासनाच्या नियमाप्रमाणे मा. महापौर पदाचा कार्यकाल हा अडीच वर्षाचा असल्याने आज माझ्या महापौर पदाच्या कार्यकालास अडीच वर्षे पूर्ण होत आहेत. शहराच्या विकासाच्या कामाबाबत आपण सर्वांनी मला साथ दिली. सभेचे कामकाज हे खेळीमेळीच्या वातावरणात पाडले त्याबद्दल सर्वांना धन्यवाद. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नवीन महापौराची आज निवड होत आहे. गेले अडीच वर्षाच्या माझ्या यशस्वी कार्याला आपल्या सर्वांचे बहुमोलाचे सहकार्य लाभल्याबद्दल मी आपल्या सर्वांचे हार्दिक आभार मानते. सर्व लोकप्रतिनिधींना हार्दिक शुभेच्छा. सचिव, पुढील सभेचे कामकाज सुरु करावे. धन्यवाद.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७३ चे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

शासनाच्या नवीन नियमाप्रमाणे निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर केला होता. मंत्रालय, मुंबई, दि. ११/०२/२००५ च्या आदेशाप्रमाणे मा. पीठासीन अधिकारी निवडणुक लढविण्याच्या प्रत्येक उमेदवारासाठी प्रत्येकाचे नांव घोषित करुन आणि हात करुन त्या मतदाराची नोंद घेईल अशी तरतुद नव्या नियमात केलेली आहे. मा. महापौरांच्या पदाकरिता नामनिर्देशन पत्र दाखल करावयाच्या तारखेस दि. २४/०२/२००५ रोजी चार नामनिर्देशन पत्र ही दाखल झालेली होती. परंतु, उमेदवार हा एकच आहे आणि महापौर पदसुध्दा हे एकच आहे. तरी आलेले अर्ज हे मी मा. महापौरांकडे सुपुर्द करित आहे. नामनिर्देशन पत्र ही जरी चार असली तरी उमेदवार हा एकच आहे आणि चारही नामनिर्देशन पत्र वैध असल्याचे मी मा. महापौरांच्या वतीने जाहिर करित आहे.

**मा. महापौर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे महापौर या पदासाठी सौ. निर्मला बाबुराव सावळे ह्या एकच उमेदवार असल्याने त्या बिनविरोध निवडून आल्या असे मी जाहिर करते.

**प्रकरण क्र. ७३:-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्यांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे ''महापौर'' पदावर अडीच वर्षासाठी निवड करणे.

**ठराव क्र. ७७ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम १९(१) अन्वये पुढील अडीच वर्षाच्या कालावधीसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या **''महापौर''** पदाकरिता नामनिर्देशन पत्र निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस **सौ. निर्मला बाबुराव सावळे** यांनी आपले नामनिर्देशनपत्र दाखल केले होते.

**''महापौर''** पद एकच असल्याने व उमेदवार **सौ. निर्मला बाबुराव सावळे** ह्या एकच उमेदवार असल्याने, **सौ. निर्मला बाबुराव सावळे** ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महापौर पदी बिनविरोध निवडून आल्याची मी घोषणा करीत आहे.

**सही/-**
**महापौर / पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. सचिव :-**

नवनिर्वाचित महापौर मा. महापौरांनी घोषित केलेले सौ. निर्मला सावळे यांना मा. महापौरांच्या वतीने मी डायसवरती येण्यास विनंती करित आहे. आता नवनिर्वाचित महापौरांचे मावळत्या महापौर पुष्पगुच्छ देउन सत्कार करतील. सत्काराचा पुढील कार्यक्रम उपमहापौर निवडणुकीचा कार्यक्रम झाल्यानंतर करण्यात येईल. मी सभागृह नेते यांना विनंती करतो की, मावळत्या महापौर सौ. मायरा गिल्बर्ट मेन्डोसा यांना सभागृहाच्या उजव्या बाजूला, सभागृह नेत्यांच्या उजव्या बाजूस असलेल्या खुर्चीवर आसनस्थ होण्यासाठी मानाने घेउन जायचे आहे. स्थायी समिती सभापती श्री. मोहन पाटील हे नवनिर्वाचित महापौरांचे सत्कार करित आहे. सभागृहाच्या वतीने सर्व पक्षाचे गटनेते नवनिर्वाचित

महापौरांचा सत्कार करित आहेत. भारतीय जनता पार्टीचे गटनेते श्री. रोहिदास पाटील नवनिर्वाचित महापौरांचा आणि मावळत्या महापौरांचा पुष्पगुच्छ देउन सत्कार करित आहेत. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती साहेब नवनिर्वाचित महापौरांचा सत्कार करीत आहेत. नवनिर्वाचित महापौर पिठासीन अधिकार म्हणून काम पहातील.

**मा. महापौर (निर्मला सावळे.) :-**

सचिव साहेब, उपमहापौर निवडणुकीचा कार्यक्रम सुरु करावा.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७४ चे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, मा. उपमहापौर पदाच्या निवडणुकीकरिता नामनिर्देशन पत्र दाखल करावयाच्या तारखेस दि. २४/०२/२००५ रोजी एकूण तीन सदस्यांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केली असून सर्व नामनिर्देशन पत्रे महापौरांकडे सुपुर्द करित आहे. त्या सन्मा. सदस्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत. वैती चंद्रकात सिताराम, प्रियांका प्रकाश करंबेळेकर आणि जयंत महादेव पाटील ह्या तिन्ही उमेद्वारांची नामनिर्देशन पत्रे वैध आहेत असे मी महापौरांच्या वतीने जाहिर करतो. महापौरांच्या वतीने या तीन अर्जापैकी निवडणुक प्रक्रिया सुरु होण्या अगोदर मी पंधरा मिनिटाचा अवधी देतो. ज्या उमेदवारांना आपली नामनिर्देशन पत्रे मागे घ्यायची असतील त्यांनी ती पंधरा मिनिटात मागे घ्यायची आहेत. सन्मा. सदस्य जयंत महादेव पाटील यांनी लेखी अर्ज देऊन आपली उमेदवारी मागे घेतलेली आहे. आता फक्त दोनच अर्ज शिल्लक राहिलेले आहेत. त्यांची नावे सन्मा. सदस्य वैती चंद्रकांत सिताराम आणि सन्मा. सदस्या प्रियांका प्रकाश करंबेळेकर अशी आहेत.

**प्रियांका करंबेळे :-**

सचिव साहेब, माझे आडनांव करंबेळेकर नसुन करंबेळे असे आहे. आपण मघाशी करंबेळेकर असा उल्लेख केला.

**प्र. सचिव :-**

सन्मा. सदस्या प्रियांका करंबेळे, तुमच्या आडनांवाची दुरुस्ती करण्यात येईल. आपल्याला पंधरा मिनिटाचा अवधी दिलेला आहे. आता १२.०५ वाजलेले आहेत. आपल्याला १२.२० वाजेपर्यंतची वेळ दिलेली आहे. ज्या उमेदवारांना अर्ज मागे घ्यायचा आहे. ते उमेदवार पंधरा मिनिटाच्या अवधीत अर्ज मागे घेउ शकतील. त्यानंतर निवडणुक प्रक्रियेला सुरुवात होईल. मा. महापौरांच्या परवानगीने दिलेल्या पंधरा मिनिटाचा अवधी पूर्ण झालेला आहे. आता दोन उमेदवार शिल्लक राहिलेले आहेत. एक उमेदवार सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती आणि दुसऱ्या उमेदवार सन्मा. सदस्या प्रियांका करंबेळे या आहेत.

**आसिफ शेख :-**

अखेरची दोन मिनिट संधी द्या. मन परिवर्तन झाले तर बिनविरोध होऊन जाईल.

**प्र. सचिव :-**

आमची पंधरा मिनिट संपलेली आहेत.

**आसिफ शेख :-**

सुसंवाद साधून घ्या म्हणजे मन परिवर्तन झाले तर.

**प्र. सचिव :-**

दोन उमेदवार असल्यामुळे शासनाच्या नवीन नियमाप्रमाणे प्रत्येक उमेदवाराचे नाव घोषित करिल व हात वर करुन मताची नोंद घेईल. त्या उमेदवारांच्या बाजूने मत दिले अशा पालिका सदस्याचे नांव नोंदविले जाईल अशी जी तरतुद आहे. त्या तरतुदीनुसार मी मतदानाच्या प्रक्रियेला सुरुवात करित आहे. वर्णानुक्रमाप्रमाणे आलेल्या उमेदवाराचे मी पूर्ण नाव घोषित करतो. ज्या नगरसेवकांना त्यांच्या बाजूने मतदान करायचे असेल त्यांनी आपला हात पूर्णपणे वर करायचा आहे. मतदान प्रक्रिया सुरु झाल्यावर कोणत्याही सदस्याने सभागृहाच्या बाहेर जाउ नये ही विनंती. प्रथम मी सन्मा. सदस्या प्रियांका प्रकाश करंबेळे यांच्या नावाच्या बाजूने जे सदस्य असतील त्यांनी आपले हात वर करायचे आहेत.

१) श्री. म्हात्रे मिलन वसंत
२) श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
३) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
४) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
५) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
६) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
७) श्री. सिंग मदन उदितनारायण

८) श्री. पाटील रोहिदास शंकर
९) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
१०) श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
११) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
१२) श्री. पाटील अशोक पांडुरंग
१३) श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
१४) श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१५) श्रीम. पाटील भानु भगवान
१६) श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह
१७) श्री. पाटील रतन कृष्णा
१८) श्री. पाटील अनंत रामचंद्र
१९) श्रीम. नाईक शुभांगी सिताराम
२०) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
२१) श्रीम. शाह रक्षा एस.
२२) श्री. जैन रमेश धरमचंद्र

**प्र. सचिव :-**

आता सन्मा. सदस्य वैती चंद्रकांत सिताराम यांच्या बाजूने जे सदस्य असतील त्या सदस्यांनी हात वर करायचे आहेत.

१) श्रीम. मेंन्डोसा मायरा गिल्बर्ट
२) श्री. वैती चंद्रकांत सिताराम
३) श्री. पाटील मोहन मधुकर
४) श्री. कोलासो लिओ इजिदोर
५) श्री. पाटील परशुराम दामोदर
६) श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
७) श्रीम. सपार उमा विश्वनाथ
८) श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज
९) श्री. पाटील चिंतामण कमलाकर
१०) श्री. पाटील अशोक बळवंत
११) श्रीम. म्हात्रे संगीता विजय
१२) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
१३) श्री. शेख आसिफ गुलाब
१४) श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
१५) श्रीम. गोहिल शानु
१६) श्री. नलावडे दिनेश द.
१७) श्री. पांडे हंसु कमलकुमार
१८) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१९) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
२०) श्री. पाटील जयंत महादेव
२१) श्रीम. सावळे निर्मला बाबूराव
२२) श्री. माळी रविंद्र भीमदेव
२३) श्री. घरत केशव रामभाऊ
२४) श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
उर्फ
शिंदे पुजा प्रताप
२५) श्रीम. वाडे जिवी हिरा
२६) श्री. गावंड आत्माराम बाळाराम
२७) श्रीम. पाटील अनिता जयवंत
२८) श्री. गावंड हरेश लक्ष्मण
२९) श्रीम. भोईर जयाबाई यशवंत
३०) श्री. पटेल आसिफ गुलाम
३१) श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव

३२)    श्रीम. गायकवाड सुरेखा यशवंत
३३)    श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
३४)    श्री. खान शफीक अहमद
३५)    श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन
३६)    श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
३७)    श्री. मेंडोसा स्टिवन जॉन
३८)    श्री. पाटील रोहिदास आत्माराम
३९)    श्री. कुरेशी याकुब इस्माईल
४०)    श्रीम. भामरे उर्मिला कोमल
४१)    श्रीम. जैन गिता भरत
४२)    श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ
४३)    श्री. शहा शशिकांत रतिलाल
४४)    श्रीम. शाह रिटा सुभाष
४५)    श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
४६)    श्री. पाटील ध्रुवकिशोर
४७)    श्री. पाटील शरद केशव
४८)    श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
४९)    श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ
५०)    श्रीम. रांजणकर मुक्ता प्रविण
५१)    श्री. पाटील प्रेमनाथ गजानन
५२)    श्री. मेहता नरेंद्र
५३)    श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू
५४)    श्री. पाटील मिलन गोविंदराव

**मा. महापौर (निर्मला सावळे.) :-**

दोन्ही उमेदवारांच्या बाजूने हात वर करुन मतदान घेतले असता सन्मा. सदस्या प्रियांका करंबेळे यांना २२ मते व सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांना ५४ मते मिळाली. या दोन्ही उमेद्वारांपैकी सर्वात जास्त मते सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांना मिळाल्याने सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती हे उपमहापौर पदी बहुमताने निवडुन आल्याचे मी जाहिर करित आहे.

**प्रकरण क्र. ७४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्यांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे ''उपमहापौर'' पदावर अडीच वर्षासाठी निवड करणे.

**ठराव क्र. ७८ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(१) मधील तरतुदींनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उपमहापौर पदाकरिता निश्चित केलेल्या तारखेस व वेळेस नामनिर्देशन पत्रे मागविली असता एकूण तीन सदस्यांनी पाच नामनिर्देशन पत्रे दाखल केली होती. त्या सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे :-

**१) जयंत महादेव पाटील**
**२) सौ. प्रियांका प्रकाश करंबेळे**
**३) वैती चंद्रकांत सिताराम**

उपमहापौर पद हे एकच पद असल्याने, या पदासाठी ३ उमेदवार आहेत. म्हणून सभागृहात पिठासिन अधिकारी यांनी उमेदवारांस कोणास आपली उमेदवारी मागे घ्यावयाची आहे असे सांगितल्यावरुन **श्री. जयंत महादेव पाटील** यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याचा अर्ज पिठासिन अधिकारी यांचेकडे सुपूर्द केला. त्यामुळे ''उपमहापौर'' पदाच्या निवडणुकीसाठी दोनच उमेदवार शिल्लक राहिले. त्यानंतर पिठासिन अधिकारी ह्यांनी दोन्ही उमेदवारांच्या बाजूने **''हात वर''** करुन मतदान घेतले असता **१) श्रीम. प्रियांका करंबेळे** यांना २२ मते; **२) श्री. चंद्रकांत वैती** यांना ५४ इतकी मते मिळाली.

या दोन्ही उमेदवारांपैकी सर्वात जास्त मते **श्री. चंद्रकांत वैती** यांना मिळाल्याने **श्री. चंद्रकांत वैती** हे **''उपमहापौर''** पदी बहुमताने निवडून आल्याचे मी जाहीर करीत आहे.

**सही/-**
**महापौर/पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. सचिव :-**

नवनिर्वाचित उपमहापौर चंद्रकांत वैती साहेब यांना सभागृह नेते डायसवर घेऊन येत आहेत. ज्या सदस्यांना मा. महापौर आणि मा. उपमहापौर यांचा सत्कार करायचा आहे. त्या सदस्यांनी सत्कार करुन घ्यायचा आहे. स्थायी समितीचे सभापती श्री. मोहन पाटील हे सत्कार करित आहेत. स्थायी समितीचे माजी सभापती मॉरस रॉड्रिक्स, विरोधी पक्ष नेते परशुराम पाटील हे मा. महापौर आणि मा. उपमहापौर यांचा सत्कार करित आहेत. माजी महापौर मायरा मेन्डोसा या नवनिर्वाचित महापौर आणि उपमहापौर यांचा सत्कार करित आहेत. सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल आणि सन्मा. भारतीय जनता पक्षाचे गटनेते श्री. रोहिदास पाटील हे मा. महापौर आणि मा. उपमहापौर यांचा सत्कार करित आहेत. सर्व पक्षाचे सन्मा. गटनेते आणि सर्व सन्मा. सदस्यांनी पुष्पगुच्छ देउन नवनिर्वाचित महापौर आणि उपमहापौर यांचे अभिनंदन केले. तरी नवनिर्वाचित महापौर आपले मनोगत व्यक्त करित आहेत.

**निर्मला सावळे (मा. महापौर) :-**

महामानव भारतरत्न भारतीय घटनेचे शिल्पकार परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले तसेच स्वातंत्र्य संग्रामातील सर्व शूरवीरांना, नेत्यांना, राष्ट्रपिता महात्मा गांधी, स्व. इंदिरा गांधी, स्व. राजीव गांधी या थोर हुतात्म्यांना अभिवादन करुन माझे माता पिता, बंधु-भगिनी यांचे स्मरण करुन आमचे आदरणीय नेते मा. शरदचंद्रजी पवार साहेब, मा. सोनिया गांधीजी, मा. आर .आर. पाटील साहेब, मा. अरुण गुजराथी साहेब, राष्ट्रवादी पार्टीचे नेते, महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती मा. वसंतराव डावखरेसाहब आणि राष्ट्रीय पक्षाचे उपाध्यक्ष आदरणीय लोकनेते राज्य उत्पादन शुल्क व पर्यावरण मंत्री, पालकमंत्री ना. गणेश नाईक साहेब, मिरा भाईंदर नगरपालिकेचे प्रथम नगराध्यक्ष मा. गिल्बर्ट मेन्डोसा साहेब तसेच स्थानिक आमदार काँग्रेस पक्षाचे नेते आदरणीय मुजफ्फर हुसेन साहेब या सर्वांना कृतज्ञपूर्वक आठवण करुन व त्या सर्वांना अभिवादन करुन महापौर म्हणून माझे मनोगत मी या ठिकाणी व्यक्त करित आहे. आजच्या महासभेचे पीठासीन अधिकारी तथा आमच्या सर्वाधिक आदरणीय नेत्या प्रथम महापौर मायराजी मेन्डोसा, मा. उपायुक्त अशोककुमार रणखांब साहेब, मा. महापालिका सचिव श्री. हरेश पाटील साहेब, मा. उपमहापौर चंद्रकांत वैती, आमचे मा. शहर जिल्हा अधक्ष तसेच स्थायी समितीचे सभापती मोहन पाटील साहेब, सभागृह नेते श्री. लिओ कोलासो साहेब, विरोधी पक्ष नेते श्री. परशुराम पाटील साहेब, महिला व बालकल्याण समिती सभापती जेन्वी अल्मेडा व उपसभापती उमा सपार, राष्ट्रवादी पक्षाचे गटनेते श्री. रविंद्र माळी, भारतीय जनता पार्टीचे गटनेते श्री. रोहिदास पाटील, शिवसेनेचे गटनेते श्री. रतन पाटील, शहर विकास आघाडीचे गटनेते श्री. शशिकांत भोईर, जनता दलाचे गटनेते श्री. मिलन म्हात्रे, सत्ताधारी गट, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व काँग्रेस पक्ष यांचे सर्व नगरसेवक, नगरसेविका व इतर पक्षाचे सर्व नगरसेवक, नगरसेविका, सर्व स्विकृत नगरसेवक, राष्ट्रवादी पक्षाचे कार्याध्यक्ष नगरसेवक मा. प्रकाश ठाकुर साहेब, सभागृहातील सर्व अधिकारी वर्ग, सर्व कर्मचारी वर्ग, वार्ताहर कक्षातील सर्व पत्रकार बंधु, प्रसार माध्यमाचे प्रतिनिधी, फोटोग्राफर्स, नागरिकांच्या कक्षात उपस्थित सर्व नागरिक बंधु-भगिनी व सर्व प्रिय शहरवासियांना, सर्वांना अभिवादन करुन महापौर म्हणून माझे मनोगत मी या ठिकाणी व्यक्त करित आहे. बंधु आणि भगिनींनो मनात पुसटशीही कल्पना नसताना देखील घटनाकारांनी महिलांसाठी व मागासवर्गीयांसाठी राखून ठेवलेल्या व जतन करावयाच्या आरक्षण पध्दतीमुळे मी आपल्या या मोठ्या अवाढव्य शहराची महापौर झाली आहे, म्हणून मी आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार मानते. मावळत्या प्रथम महापौर मा. मायरा मेन्डोसा यांनी दि. २८/०८/२००२ रोजी या शहराच्या प्रथम व ऐतिहासिक महापौर म्हणून पदभार स्विकारला. एका महिलेने व एका गृहिणीने गेले अडीच वर्षे तो पदभार मोठ्या कौशल्याने व तेवढया सचोटीने सांभाळला. त्यामुळे त्यांच्या त्या कर्तृत्वाने मी भारावून गेले आहे. त्यांनी महापौर पदाची कारकिर्द अत्यंत उत्तम रित्या सांभाळली. सभागृहात व सभागृहाबाहेर त्या मानाने उभ्या राहिल्या व आज त्यांचाच आशिर्वाद आहे. या शहराचे कर्मवीर शहराचे आदरणीय नेते प्रथम नगराध्यक्ष मा. गिल्बर्ट मेन्डोसा साहेब यांच्यामुळे व पालकमंत्री ना. गणेश नाईक यांच्या आशीर्वादामुळेच आज मला हे योगदान मिळालेले आहे. म्हणून त्या दोघा उभयतांचे, पालकमंत्र्यांचे व पक्षश्रेष्ठींचे, सर्वांचे मी पुन्हा एकदा मनःपूर्वक आभार मानीत आहे. माझ्या निवडीचा मला दुसरा अभिमान आणि आनंद यामुळे होत आहे की, माझ्या निवडीमुळे मागासलेल्या समाजाला, मागासलेल्या घटकाला व माणसाला एवढे मोठे पद मिळू शकते हे घटनेने, या सभागृहाने सिध्द केलेले आहे. म्हणून मी आपणा सर्वांची शतशः ऋणी आहे. माझ्या निवडीमुळे मी आपणास असे आश्वासित करते की, मी सभागृहात व सभागृहाबाहेर आपल्याशी सौजन्याने राहिन. तथापि, आपण

सर्वांनी, सर्व पदाधिकाऱ्यांनी, सर्व नगरसेवक, नगरसेविकांनी, गटनेते मा. आयुक्त, मा. उपायुक्त, अधिकाऱ्यांनी मला महापालिकेच्या कामकाजात सहकार्य करावे. सर्व नागरिक, प्रसारमाध्यमे, मिडीया यांनीही सहकार्य करावे अशी त्यांना विनंती आहे. विरोधी पक्षाचे नेते, नगरसेवक बांधवांनासुध्दा मी सन्मानपूर्वक वागणूक देईन अशी मी ग्वाही देते. माझ्या निवडीसाठी ज्यांनी ज्यांनी हस्ते, परहस्ते मला सहकार्य केले. त्यांनी त्याग केला. त्या सर्वांचे मी मनःपूर्वक ऋणी आहे. मी ऋण व्यक्त करते. सभागृहातील सर्व विशेष करुन महिला नगरसेविका यांचेही मी आभार मानीत आहे. पुढिल शहर विकास कामासाठी मी कटिबध्द राहिन. ज्याप्रमाणे प्रथम महापौर मा. मायरा मेन्डोसा मॅडमनी केलेल्या विकास कामांची मी पूर्तता करिन अशी मी इथे ग्वाही देते. जय हिन्द, जय महाराष्ट्र, जय भीम.

**लिओ कोलासो :-**

मिरा भाईंदर शहराच्या दुसऱ्या ऐतिहासिक महापौर म्हणून सौ. निर्मलाजी सावळे यांची निवड झालेली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेस पक्ष आणि मला सांगायला आनंद होईल की, मतदानामध्ये सामील असलेल्या शहर विकास आघाडीचेसुध्दा ह्या महापौर निवडीमध्ये मोठे योगदान आहे. आपण सर्वांनी त्याचा आनंद टाळ्या वाजवून व्यक्त केलेला आहे. मित्रांनो मावळत्या महापौर मा. मायराजी मेन्डोसा यांनी गेल्या अडीच वर्षामध्ये आपणा सर्वांसह, सर्वांना घेउन बरोबरीने या शहराच्या विकासाचे कार्य अत्यंत पोटतिडीकेने, अत्यंत कौशल्याने आणि तेवढ्याच हसरेपणाने आणि आनंदाने स्विकारले. आज नवीन महापौर निवडण्याची वाट त्यांनी मोकळी करुन दिली. मा. महापौर मायराजी मेन्डोसा या ह्या सभागृहात असताना मला आनंद आहे की, शेवटच्या क्षणाला सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेबांनी एक चांगली सुचना आणली की, ह्या महापौर ज्या आज कार्यनिवृत्त होत आहेत त्यांचे खास अभिनंदन करण्यासाठी ह्या सभागृहाने ठराव पारित करणे आवश्यक आहे. परंतु, निवडणुकीची जी प्रक्रिया आहे ती फार डेलिकेट आहे आणि त्या दृष्टिकोनातून जरी आपणाला पदभार सोडण्यापूर्वी मा. मायराजींच्या अभिनंदनाचा ठराव करता आला नाही तरी वेळ काही गेलेली नाही. मा. मायराजींच्या कार्याच्याबद्दल सन्मा. सदस्य जयंत पाटील, कॉंग्रेस पार्टी आणि सर्व इतर पक्षाच्या सदस्यांनीसुध्दा व्यक्त केल्याप्रमाणे मा. मायराजींच्या अभिनंदनाचा ठराव आपण मांडावा असे मी सन्मा. सदस्य जयंत पाटील यांना विनंती करतो.

**जयंत पाटील :-**

नवनिर्वाचित महापौर, उपमहापौर जे मागच्या टर्मपासून आहेत. सचिव साहेब, उपायुक्त रणखांब साहेब, सर्व नगरसेवक, नगरसेविका. उच्च पदस्थ पदावर गेल्यानंतर ती खुर्ची आपल्याकडे कायमची राहत नाही. मग ते पंतप्रधान असो, मुख्यमंत्री असो, महापालिकेचे महापौर असो किंवा इतर कोणी असो. उगवलेला दिवस त्याची संध्याकाळ होतच असते आणि आपण त्याची पूर्वतयारी निश्चितच केलेली असते. पण काही व्यक्ती अशा स्मरणात राहतात. त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीमुळे असो किंवा इतर गोष्टींमुळे असो, आपल्याला त्यांचे विस्मरण होत नाही. कदाचित आपल्याला सांगितले तर आश्चर्य वाटणार नाही की, माझी ही नगरसेवक पदाची तिसरी टर्म आहे. आम्ही नगराध्यक्ष पाहिलेले आहेत. दोन नगराध्यक्ष पाहिलेले आहेत. सन्मा. नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील साहेब आणि माजी नगराध्यक्ष सन्मा. गिल्बर्ट मेन्डोसा साहेब. परंतु, मी या तिसऱ्या टर्ममध्ये अवश्य पाहिलेले आहे आणि माझ्यासोबत असलेल्या इतर नगरसेवकांनी पाहिले असेल की, माजी महापौर आम्हाला माजी म्हणायलासुध्दा जड जाते. त्यांचा गेल्या अडीच वर्षाचा कालखंड आम्ही जो पाहिला आणि सभागृहात त्यांनी जे वातावरण निर्माण केले. त्यांनी हसतखेळत हे जे सभागृह कुठलेही कॉन्ट्रावर्सी न करता जे चालविले त्याबद्दल खास करुन मी त्यांचे अभिनंदन करतो. अतिशय चांगल्या तऱ्हेने सभागृह चालविणे काही साधी गोष्ट नाही. कारण चांगले हुशार असलेले नगराध्यक्षसुध्दा सभागृहाच्या समोर कशा तऱ्हेने बोलावे, कशा तऱ्हेने वागावे किंवा कशा तऱ्हेने सभागृहात रुलिंग द्यावे आणि जो झालेला प्रचंड गदारोळ आम्ही त्या काळामध्ये पाहिलेला आहे. परंतु, मायराजी मेन्डोसा यांच्या कालावधीमध्ये सभागृह व्यवस्थितपणे चालले आणि त्यांच्या कालावधीमध्ये अनेक तऱ्हेच्या योजना या पालिकेमध्ये राबविल्या गेल्या. आपण रेल्वेला ओलांडणारा पुल पाहिला, आपण काशीमिरावरुन येणारा रस्ता पाहिला तर या शहराचे चित्रच त्यांनी बदलून टाकलेले आहे असे निश्चितच म्हणावे लागेल. काही योजना त्यांच्या हातून व्हायला पाहिजे होत्या. या शहरातील लोकांसाठी सुंदर हॉस्पिटल व्हायला पाहिजे होते, ते होणारच आहे. नवीन आलेल्या महापौरांकडून ते होईल. परंतु, माजी महापौरांकडून झाले असते तर अजून आनंद झाला असता. पुन्हा एकदा सर्व कॉंग्रेसच्या नगरसेवकांतर्फे आणि आपल्या सर्व सभागृहाच्या नगरसेवकांतर्फे मी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे. जय हिन्द.

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी जो अभिनंदनाचा ठराव मांडलेला आहे. परंतु, मी या सभागृहाची तिसऱ्या टर्ममध्ये नगरसेविका म्हणून कार्य करीत आहे. परंतु, प्रथम नगराध्यक्ष गिल्बर्ट जॉन मेन्डोसा आणि दुसरे नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील यांचा कार्यकाळ मी बघितलेला आहे. सभागृहामध्ये नेहमी कॉम्प्लिकेशन निर्माण होते. आपला कुठल्याही विषयावर वादविवाद होतो. परंतु, एक महिलांच्या वतीने एक स्त्री म्हणून सहनशिलतेची देवी असे आपण बोलतो आणि मायरा मॅडमनी कारण मागील जे दोन नगराध्यक्ष होते. कुठल्याही विषयावर ते केव्हातरी रागवायचे, गरम व्हायचे. परंतु, मायरा मॅडमनी एक सहनशीलतेची देवी म्हणून, एक स्त्री म्हणून त्यांनी ह्या सभागृहाचे जे वातावरण हसतखेळत अडीच वर्षे चालविलेले आहे. त्याबद्दल एक महिला म्हणून मी त्यांचे गौरव म्हणून अभिनंदन करित आहे. जय हिन्द, जय महाराष्ट्र.

**अभिनंदन ठराव क्र. ७९ :-**

माजी महापौर मा. श्रीम. मायरा मेन्डोंन्सा यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रथम महिला महापौर बनुन नवा इतिहास निर्माण केला. तसेच त्यांनी अडीच वर्षाच्या कालावधीमध्ये मिरा भाईंदर शहराचा उत्कृष्ट विकास करुन आपल्या कामाची उत्तम छाप पाडली. अशा त्यांच्या दैदिप्यमान कामगिरीबाबत ही सर्वसाधारण सभा त्यांचे कौतुक करीत असून अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. विरोधी पक्ष नेते, मा. सभागृह नेते, मा. प्र. सचिव, सर्व नगरसेवक-नगरसेविका, अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०१.०० वाजता**

**।सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**